Exh.51

नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब [ज्यु. डि.]
यांचे कोर्टात....

वादी

चांगदेव विठ्ठल टकले, वगैरे.

रे. मु. नं.
५५०/२०२४

प्रतिवादी

खंडु ठकाजी कोकरे, वगैरे.




यांकामी प्रतिवादी नं. १ व ३ तर्फे विनंती अर्ज की,

नंबर मजकुरचा दावा वादीने प्र.वादीविरुध्द निरंतर ताकीद व मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्यामध्ये वादी यांनी नि. ४७ ला अर्ज दाखल केला, त्यावर प्र. वादींविरुध्द नो.से. ची ऑर्डर झालेली आहे. प्र. वादी यांना नि. ४७ च्या अर्जासंदर्भात काही महत्त्वाची कागदपत्रे व माहिती वेळेत मिळाली नाही. त्यामुळे नि. ४७ वर प्र. वादींना म्हणणे देता आलेले नाही. नि. ४७ वर प्र. वादीचे म्हणणे दाखल करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे व नि. ४७ चा अर्ज दुतर्फा चालविणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. दावा स्थावर मिळकतीचा आहे. प्र. वादीचे नि. ४७ वर म्हणणे दाखल न झाल्यास प्र. वादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे व प्र. वादींना त्यांचे न्यायहक्कांपासुन वंचित रहावे लागणार आहे.

तरी मे. साहेबांस नम्र विनंती की, प्र. वादींविरुध्द नि. नं. ४७ वर झालेला नो. से. चा आदेश रद्द करण्यात यावा व प्र. वादीचे म्हणणे स्विकारण्यात येवुन अर्जाचे कामकाज दुतर्फा चालविण्याचा हुकुम व्हावा ही नम्र विनंती.

Order
--------------------------
Other side to say

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.02.11 17:10:29 +0530

2nd Jt.CJJD newasa

सोबत अॅफिडेव्हीट दिले आहे, तरी अर्ज मंजुर व्हावा ही विनंती.

नेवासा.

दि. ११/०२/२०२६

प्र. वादीतर्फे अॅडव्होकेट.

प्र. वादी नं. ३

Exh.52

// ॲफिडेव्हीट //

नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब [ज्यु. डी.]

यांचे कोर्टात....

वादी

रे.मु.नं.
५५०/२०२४

चांगदेव विठ्ठल टकले, वगैरे.

प्रतिवादी

खंडु ठकाजी कोकरे, वगैरे.

याकामी मी प्रकाश खंडु कोकरे, वय-३५ धंदा शेती, रा. देडगांव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की,

---

नंबर मजकुरचा दावा वादीने प्र.वादीविरुध्द निरंतर ताकीद व मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्यामध्ये वादी यांनी नि.४७ ला अर्ज दाखल केला, त्यावर प्र.वादींविरुध्द नो.से. चो ऑर्डर झालेली आहे. प्र.वादी यांना नि.४७ च्या अर्जासंदर्भात काही महत्त्वाची कागदपत्रे व माहिती वेळेत मिळाली नाही. त्यामुळे नि.४७ वर प्र.वादींना म्हणणे देता आलेले नाही. नि. ४७ वर प्र.वादीचे म्हणणे दाखल करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे व नि.४७ चा अर्ज दुतर्फा चालविणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. दावा स्थावर मिळकतीचा आहे. प्र.वादीचे नि. ४७ वर म्हणणे दाखल न झाल्यास प्र.वादीचे कधीही व कशानेही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे व प्र.वादींना त्याचे न्यायहक्कांपासुन वंचित रहावे लागणार आहे.

तरी मे. साहेबांस नम्र विनंती की, प्र.वादींविरुध्द नि.नं.४७ वर झालेला नो.से.चा आदेश रद्द करण्यात यावा व प्र.वादीचे म्हणणे स्विकारण्यात येवुन अर्जाचे कामकाज दुतर्फा चालविण्याचा हुकुम व्हावा ही नम्र विनंती.

Order
---
Seen & filed

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.02.11 17:10:35 +0530

2nd Jt.CJJD newasa

११/२

सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
नेवासा

हे ॲफिडेव्हीट दिले असे.

नेवासा.

दि. ११/०२/२०२६

ॲफि. करणार

ओळख-

[ॲड. एस. एस. गव्हाणे ]

याकामी मी प्रकाश खंडु कोकरे, वय-३५ धंदा शेती, रा. देडगांव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वरील संपुर्ण मजकुर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन त्याचे सत्यतेसाठी मी आज रोजी नेवासा येथे या लेखाखाली माझी सही केली असे.

नेवासा.

दि. ११/०२/२०२६

ॲफि. करणार.

Solemnly affirmed before me by Prakash Khandu Kokare Age 35 R/o Dedgaon Tal Newasa
who is identified before me
by Adv S S Gavhane
whom I personally know

Asstt Superintendent

Exh.53

नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब [ज्यु. डी.]

यांचे कोर्टात....




रे.मु.नं.

५५०/२०२४

वादी

चांगदेव विठ्ठल टकले, वगैरे

प्र.वादी

खंडु ठकाजी कोकरे, वगैरे.

याकामी प्र.वादी नं.१ व ३ तर्फे विनंती अर्ज की,

नंबर मजकुरच्या दाव्यामध्ये प्र.वादी हे आज रोजी मा.उप-विभागीय अधिकारी ,अहिल्यानगर भाग अहिल्यानगर यांचे कडील आर.टी,एस.अपील नं.९२/२०२४ मधील आदेशाची सर्टि.नक्कल पुराव्याचेकामी दाखल करीत आहे.तरी सदर आदेशाची सर्टि.नक्कल पुराव्याकामी दाखल करुन घेण्यात यावी व त्यास निशाणी नंबर देवुन पुराव्याकामी वाचण्यात यावी ही नम्र विनंती.

अर्ज मंजुर व्हावा ही विनंती.

Order

Production of documents is allowed.

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.02.11 17:10:41 +0530

2nd Jt.CJJD newasa

नेवासा.

दि. ११/०२/२०२६

प्र.वादीतर्फे ॲडव्होकेट.

Exh.54

नेवासा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब [ज्यु. डी.]
याचे कोर्टात....

रे.मु.नं.
५५०/२०२४

वादी
---
यशिदेव विठ्ठल टकले, वगैरे
प्र.वादी
---
खंडू ठकाजी कोकरे, वगैरे.

Order
---
Seen & filed

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.02.11 17:10:47 +0530

2nd Jt.CJJD newasa

याकामी प्र.वादी नं.१ व ३ तर्फे दाखल कागदपत्रांची वर्णनयादी खालीलप्रमाणे...

---

१] मा. उपविभागीय अधिकारी साहेब, अहिल्यानगर याचे कडील आर.टी.एस. अपील नं. ९२/२०२४ मधील निकाल-पत्र व ~~अमेंड~~ जज्जमेंटची सर्टि. नक्कल.

येणेप्रमाणे प्र.वादी नं.१ व ३ तर्फे दाखल कागदपत्रे असे.

नेवासा.
दि. ११/०२/२०२६

प्र.वादीतर्फे ॲडव्होकेट.

# सुधीर पाटील, उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर भाग अहिल्यानगर यांचे समोरील कामकाज

**निर्णयाची समज** **आरटीएस अपील नं. ९२/२०२४**

१. कारभारी ठका कोकरे
रा. देडगाव, ता.नेवासा
जि.अहिल्यानगर
} ...अपेलंट

**विरुध्द**

१. मुक्ता केरु कोकरे
२. काशिनाथ नारायण कोकरे
३. खंडु ठका कोकरे
४. प्रकाश खंडु कोकरे
५. एकनाथ कल्याण बनसोडे
सर्व रा. देडगाव, ता.नेवासा जि.अहिल्यानगर
} ...रेस्पॉडंट

**महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे अपील**
**वाद मिळकतीचा तपशिल**

| गावाचे नाव व तालुका | स.नं./ गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) | शेरा |
|---|---|---|---|---|
| मौजे देडगाव, ता.नेवासा | ३१२/२<br>३१२/३<br>३१२/१ पैकी | १.०८<br>१.०७<br>१.३७ | १.१५<br>१.१५<br>१.४२ | तहसिलदार नेवासा यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये दिनांक १६/०२/२०२४ रोजी दिलेले आदेशा विरुध्द सदरचे अपील. |

## आदेश

१. **अपेलंट यांचे अपील अशंतः मंजुर करण्यात येत आहे.**
२. **मौजे देडगाव, ता.नेवासा येथील रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये तहसिलदार नेवासा यांनी दिनांक १६/०२/२०२४ रोजी दिलेले आदेश रद्द करुन निकालपत्रात नमुद कारणास्तव प्रकरण फेरचौकशी करुन आदेश पारीत करणेकामी तहसिलदार नेवासा यांचेकडे परत पाठविण्यात येत आहे.**
३. खर्चा बाबत आदेश नाहीत.
४. निकालाची समज उभय पक्षकारांना देण्यात यावी.
५. सदरचा निकाल [redacted]
६. सदरचा आदेश मान्य नसल्यास संबंधित पक्षकार ६० दिवसांच्या मुदतीत मा.अपर जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडेस अपील दाखल करु शकतील.

**ठिकाण : अहिल्यानगर**
**दिनाक : ०३/०२/२०२५**

Digitally signed by Sudhir Martand Patil
Date: 2025.02.03 16:09:59 +05'30'

**(सुधीर पाटील)**
**उपविभागीय अधिकारी,**
**अहिल्यानगर भाग अहिल्यानगर**

उप विभागीय अधिकारी अहिल्यानगर भाग अहिल्यानगर

# सुधीर पाटील, उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर भाग अहिल्यानगर यांचे समोरील कामकाज

**आरटीएस अपील नं. ९२/२०२४**

| | | |
|---|---|---|
| १. कारभारी ठका कोकरे<br>रा. देडगाव, ता.नेवासा<br>जि.अहिल्यानगर | } | ***...अपेलंट*** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. मुक्ता केरु कोकरे<br>२. काशिनाथ नारायण कोकरे<br>३. खंडु ठका कोकरे<br>४. प्रकाश खंडु कोकरे<br>५. एकनाथ कल्याण बनसोडे<br>सर्व रा. देडगाव, ता.नेवासा जि.अहिल्यानगर | } | ***...रेस्पॉडंट*** |

**महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे अपील**

**वाद मिळकतीचा तपशिल**

| गावाचे नाव व तालुका | स.नं./ गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) | शेरा |
|---|---|---|---|---|
| मौजे देडगाव, ता.नेवासा | ३१२/२<br>३१२/३<br>३१२/१ पैकी | १.०८<br>१.०७<br>१.३७ | १.१५<br>१.१५<br>१.४२ | तहसिलदार नेवासा यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये दिनांक १६/०२/२०२४ रोजी दिलेले आदेशा विरुध्द सदरचे अपील. |

## निकालपत्र

मौजे देडगाव, ता.नेवासा येथील गट नं. ३१२/२ व ३१२/३ चे क्षेत्रात जाणे-येणेसाठीचे रस्त्या संदर्भात तहसिलदार नेवासा यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये दिनांक १६/०२/२०२४ रोजी दिलेले आदेशावर नाराज होऊन अपेलंट यांनी सदरचे अपील दाखल केलेले आहे.

अपीलाचे चौकशीकामी दोन्ही पक्षकारांना नोटीसा पाठविण्यात आले व सुनावणीची पुरेपुर संधी देण्यात आली. अपेलंट, रेस्पॉडंट नं. १ व २ यांनी तसेच रेस्पॉडंट नं. ३,४,५ यांनी दाखल केलेला लेखी युक्तीवाद अपीलात समाविष्ट करुन गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येत आहे.

**<u>अपेलंट यांनी युक्तीवादात नमुद केले आहे की</u> -**

१) तहसिलदार नेवासा यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ या केस मध्ये बेकायदेशीरपणे अपेलंट यांच्या क्षेत्रामधुन रेस्पॉडंट नं. १ व २ यांना नवीन रस्ता मंजुर केलेला आहे.

२) रेस्पॉडंट नं. १ व २ यांनी अपेलंट व रेस्पॉडंट नं. ३ ते ५ यांचेविरुध्द नेवासा येथील तहसिलदार यांचेकडे रस्ता केस नं. ३६/२०२३ ची रस्ता केस दाखल केलेली होती.

३) सदर केसमध्ये अपेलंट व रेस्पॉडंट नं. ३ ते ५ याने तहसिलदार नेवासा यांनी कोणत्याही प्रकारचे लेखी म्हणणे दाखल केलेले नाही किंवा दाखल करून घेतले नाही व लेखी म्हणणे दाखल करण्यास संधी दिलेली नाही, तसेच दिनांक ०६/१०/२०२३ रोजी स्थळपहाणी पंचनामा बेकायदेशीरपणे करण्यात आला.

४) वास्तविक पाहता तहसिलदार यांनी रेस्पॉडंट नं. १ व २ यांना ज्या गटातुन रस्ता दिलेला आहे, त्याठिकाणी अपेलंट व रेस्पॉडंट नं. ३ यांच्या वस्त्या असुन सिमेंट कॉक्रीटचे हे आहेत. असे असतांना त्याठिकाणाहून तहसिलदार यांनी बेकायदेशीरपणे रस्ता मंजुर केलेला आहे, तसेच रेस्पॉडंट नं. १ व २ यांना त्याचे क्षेत्रामध्ये येण्या-जाण्यासाठी पर्यायी रस्ता असून सदरचा पर्यायी रस्ता हा स्थळपहाणी पंचनाम्यामध्ये दिसून येतो व तो रस्ता आज देखील खुला असून रेस्पॉडंट नं. १ व २ त्या पर्यायी रस्त्याने ये, जा करतात, तसेच स्थळपहाणी पंचनाम्याचे निरीक्षण केल्यास त्यामध्ये नमुद केले की, गटा अंतर्गत रस्ता खुला आहे, असे नमुद केले. म्हणजेच पर्यायी रस्ता खुला आहे, तसेच स्थळपंचनाम्यामध्ये अपेलंट कारभारी कोकरे यांची वस्ती दिसुन येते. तरी देखील बेकायदेशीरपणे तहसिलदार नेवासा यांनी त्याठिकाणी नवीन रस्ता देण्याचा आदेश बेकायदेशीरपणे पारित केलेला आहे. सबब अपेलंट यांचे अपील मंजुर होण्यास पात्र आहे.

५) तहसिलदार यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये ज्या ठिकाणा हून नवीन रस्ता देण्याचा आदेश पारीत केलेला आहे, त्याठिकाणी सदर अपेलंट यांची रहाती वस्ती आहे. त्यामुळे रस्ता खुला करण्याचा किंवा नवीन रस्ता देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

६) तहसिलदार नेवासा यांनी पारीत केलेला आदेश हा बेकायदेशीर असून अपेलंट यांच्यावर अन्याय करणारा आहे, तसेच रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असुन त्याबाबत नेवासा न्यायालयामध्ये रे.मु.नं. ९६८/२०२३ चा दावा दाखल असुन त्या दाव्यामध्ये मे. कोर्टाने रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता कायम केलेला आहे. त्यामुळे तहसिलदार यांनी दिनांक १६/०२/२०२४ रोजी पारीत केलेला आदेश हा बेकायदेशीर असुन रेस्पॉडंट नं. १ व २ यांनी पर्यायी रस्ता उपलब्ध असतांना देखील महाराष्ट्र लॅण्ड रेव्ह पुन्यु कोडचे कलम १४३ प्रमाणे नवीन दिलेला रस्ता हा बेकायदेशीर आहे. सदरचा रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये पारीत केलेला आदेश हा अपेलंट यांच्यावर अन्यायकारक आहे व तो संपूर्णपणे बेकायदेशीर आहे. कारण की, रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असतांना देखील नवीन रस्ता तहसिलदार नेवासा यांनी दिलेला आहे. त्यामुळे सदरचा आदेश हा बेकायदेशीर असुन तो अपेलंटवर अन्यायकारक असल्यामुळे सदरच्या आदेशावर नाराज होऊन अपेलंट यांना सदरचे अपील दाखल करणे भाग पडले आहे. सबब अपेलंट चे अपील मंजुर करण्यात यावे.

७) तहसिलदार यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये दिनांक १६/०२/२०२४ रोजी पारीत केलेला आदेश हा संपुर्णपणे अपेलंटवर अन्यायकारक आहे. रेस्पॉडंट नं. १ व २ यांना दुसरा

पर्यायी रस्ता उपलब्ध असतांना देखील तहसिलदार यांनी बेकायदेशीरपणे कायदयाची पायमल्ली करून बेकायदेशीरपणे रस्त्याबाबत आदेश पारीत केलेला आहे व तो कायदयाने रद्द होण्यास पात्र आहे.

८) सबब अपेलंटचे अपील मान्य करण्यात यावे व रस्ता केस नं. ३६/२०२३ मधील आदेश रद्द करण्यात यावा ही नम्र विनंती.

**<u>रेस्पॉडंट नं. १ व २ यांनी युक्तीवादात नमुद केले आहे की</u> -**

१) तहसिलदार नेवासा यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये दिनांक १६/०२/२०२४ रोजी पारीत केलेला आदेश हा संपूर्ण कायदेशीर तरतुदींचा विचार करुन व आलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन दिलेले असुन सदरचा निकाल या मा. कोर्टाने कायम करुन सदरचे अपिल मा. कोर्टाने खर्चासह रद्द करावे विनंती.

२) रे.मु.नं. ९६८/२०२३ या दाव्यात सदर अपिलातील अपेलंट व रेस्पॉडंट हे पक्षकार नसल्याने सदरचा निकाल हा या मा. कोर्टावर किंवा सदर अपिलातील अपेलंट व रेस्पॉडंट यांच्यावर बंधनकारक राहत नाही.

३) तसेच रे.मु.नं. ९६८/२०२३ या दाव्यात रस्त्याबाबत कोणताही उल्लेख नाही. सबब याही कारणास्तव सदरचे अपिल रद्द होण्यास पात्र आहे. विनाकारण रेस्पॉडंट यांना खर्चात पाडले म्हणुन अपेलंट कडुन रेस्पॉडंट यांना कॉस्ट मिळावी.

**<u>रेस्पॉडंट नं. ३, ४ व ५ यांनी युक्तीवादात नमुद केले आहे की</u> -**

१) अपेलंटचे अपील रेस्पॉडंट नं. ३, ४ व ५ यांना मान्य व कबुल आहे. अपेलंटच्या अपिलाप्रमाणे तहसिलदार नेवासा यांचेकडील रस्ता केस नं. ३६/२०२३ चा आदेश रद्द होण्यास पात्र आहे.

२) खरी वस्तुस्थिती अशी आहे, अपेलंट यांनी सदरचे अपील हे रेस्पॉडंट विरध्द नेवासा येथील तहसिलदार यांचे कोर्टातील रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये पारीत झालेल्या आदेशावर नाराज होवुन सदरचे अपील दाखल केले आहे. तहसिलदार यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ या केसमध्ये बेकायदेशीरपणे अपेलंट यांच्या क्षेत्रामधूम रेस्पॉडंट नं. १ व २ यांना नवीन रस्ता मंजुर केलेला आहे.

३) रेस्पॉडंट नं. १ व २ यांनी अपेलंट व रेस्पॉडंट नं. ३ ते ५ यांचेविरुध्द नेवासा तहसिलदार यांचेकडे रसता केस नं. ३६/२०२३ ची रस्ता केस दाखल केली होती. सदरच्या केस मध्ये अपेलंट व रेस्पॉडंट नं. ३ ते ५ यांचे तहसिलदार नेवासा यांनी कोणत्याही प्रकारचे लेखी म्हणणे दाखल करन घेतलेले नाही व लेखी म्हणणे दाखल करण्यास संधी दिलेली नाही, तसेच दिनांक ०६/१०/२०२३ रोजी स्थळपाहणी पंचनामा बेकायदेशीरपणे करण्यात आला.

४) वास्तविक पाहता तहसिलदार यांनी रेस्पॉडंट नं. १ व २ यांना ज्या गटातुन रस्ता दिलेला आहे, त्याठिकाणी अपेलंट व रेस्पॉडंट नं. ३ यांच्या वस्त्या असुन सिमेंट कॉंक्रीटचे घरी

आहेत. असे असतांना त्याठिकाणाहून तहसिलदार यांनी बेकायदेशीरपणे रस्ता मंजुर केलेला आहे.

५) तसेच रेस्पॉडंट नं. १ व २ यांना त्यांचे क्षेत्रामध्ये येण्या-जाण्यासाठी पर्यायी रस्ता असुन सदरचा पर्यायी रस्ता हा स्थळ पहाणी पंचनाम्यामध्ये दिसून येतो व तो रस्ता आज देखील खुला असुन रेस्पॉडंट नं. १ व २ त्या पर्यायी रस्त्याने ये जा करतात, तसेच स्थळपहाणी पंचनाम्याचे निरीक्षण केल्यास त्यामध्ये नमुद केले की, गटाअंतर्गत रस्ता खुला आहे, तसे नमुद केले. म्हणजेच पर्यायी रस्ता आहे, तसे व स्थळ पंचनाम्यामध्ये अपेलंट कारभारी कोकरे यांची वस्ती दिसून येते, तरी देखील बेकायदेशीरपणे तहसिलदार नेवासा यांनी त्याठिकाणी नविन रस्ता देण्याचा आदेश बेकायदेशीरपणे पारीत केलेला आहे.

६) तहसिलदार नेवासा यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये ज्या ठिकाणाहून नविन रस्ता देण्याचा आदेश पारीत केलेला आहे. त्याठिकाणी अपेलंट यांची रहाती वस्ती आहे. त्यामुळे रस्ता खुला करण्याचा किंवा नविन रस्ता देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

७) तहसिलदार नेवासा यांनी पारीत केलेला आदेश हा बेकायदेशीर असुन अपेलंट यांचेवर अन्याय करणार आहे. तसेच रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असुन त्याबाबत नेवासा न्यायालयात रे.मु.नं. ९६८/२०२३ चा दावा दाखल असुन त्या दाव्यामध्ये मे. कोर्टानी रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता कायम केलेला आहे. त्यामुळे तहसिलदार यांनी दिनांक १६/०२/२०२४ रोजी पारीत केलेला आदेश बेकायदेशीर असुन रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असतांना देखील महाराष्ट्र लँन्ड रेव्ह युन्यु कोडचे कलम १४३ प्रमाणे नविन दिलेला रस्ता हा बेकायदेशीर आहे.

८) सदरचा रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये पारीत केलेला आदेश हा अपेलंट यांचेवर अन्याय कारक आहे व तो संपूर्णपणे बेकायदेशीर आहे. कारण की, रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असतांना देखील नविन रस्ता तहसिलदार नेवासा यांना दिलेला आहे. त्यामुळे सदरचा आदेश हा बेकायदेशीर असुन तो अपेलंटवर अन्यायकारक आहे. त्यामुळे अपेलंट चे अपील मंजुर करण्यात यावे व तहसिलदार यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये दिनांक १६/०२/२०२४ रोजी पारीत केलेला आदेश रद्द करण्यात यावा.

९) तहसिलदार यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये रेस्पॉडंट नं. ३, ४ व ५ यांचे म्हणणे घेतले नाही व युक्तीवादही ऐकला नाही व त्यांचे अपरोक्ष सदरचा आदेश पारीत करण्यात आल्यामुळे रस्ता केस नं. ३६/२०२३ चा आदेश रद्द करण्यात यावा व पुन्हा फेरचौकशीसाठी तहसिलदार नेवासा यांचेकडे प्रकरण वर्ग करण्यात यावे ही विनंती व रेस्पॉडंट नं. ३, ४ व ५ यांचे म्हणणे दाखल करून घेण्याबाबतचा आदेश पारीत व्हावा ही विनंती.

१०) तहसिलदार यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये दिनांक १६/०२/२०२४ रोजी पारीत केलेला अदेश हा बेकायदेशीर असुन तो रेस्पॉडंट नं. ३, ४, ५ यांचेवर अन्यायकारक आहे. कारण की, रेस्पॉडंट नं. ३, ४ ५ यांचे म्हणणे ऐकून घेतले नाही. त्यामुळे अपेलंटचे अपील मंजुर करण्यात यावे ही विनंती.

<u>अपेलंट यांचा युक्तीवाद, रेस्पॉडंट नं. १ व २ यांचा युक्तीवाद व रेस्पॉडंट नं. ३,४,५ यांचा युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्र अवलोकन केले असता खालील प्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात येत आहे</u> -

मौजे देडगाव, ता.नेवासा येथील गट नं. ३१२/२ व ३१२/३ चे क्षेत्रात जाणे-येणेसाठीचे रस्त्या संदर्भात तहसिलदार नेवासा यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये दिनांक १६/०२/२०२४ रोजी दिलेले आदेशा बाबतचा वाद आहे.

| प्रकरणात निर्णय घ्यावयाचे मुद्दे | | उत्तर |
|---|---|---|
| १. | **मौजे देडगाव, ता.नेवासा येथील गट नं. ३१२/२ व ३१२/३ चे क्षेत्रात जाणे-येणेसाठीचे रस्त्या संदर्भात तहसिलदार नेवासा यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये दिनांक १६/०२/२०२४ रोजी दिलेले आदेश योग्य आहे काय ?** | अशंतः नकारार्थी |

**मुद्दा क्र. १ :-** मुळ अर्जदार सध्याचे रेस्पॉडंट नं. १ व २ यांनी तहसिलदार नेवासा यांचेकडे अर्ज सादर करुन मौजे देडगाव, ता.नेवासा येथील गट नं. ३१२/२, ३१२/३ या शेतजमिनीमध्ये जाणे-येणेसाठी नविन रस्ता मिळणेकामी दाखल केलेले अर्जावरुन तहसिलदार नेवासा यांनी केलेले स्थळनिरिक्षण पंचनाम्यात नमुद केले आहे की, 'मौजे देडगाव, ता.नेवासा येथील पाट रस्त्याने पुर्वेकडील गट नं. ३११ व ३१० पैकीच्या क्षेत्रातुन पाराजी सहादु देवकाते यांचे क्षेत्रापर्यंत रस्ता खुला असल्याचे दिसुन आले.' परंतु अपेलंट यांचे म्हणण्यानुसार ज्या गटातुन रस्ता दिलेला आहे त्या ठिकाणी अपेलंट व रेस्पॉडंट नं. ३ यांच्या वस्त्या असुन कॉंक्रिटची घरे आहेत. रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता असुन स्थळनिरिक्षण पंचनाम्या मध्ये दिसुन येत आहे. अपेलंट यांचे म्हणण्यानुसार रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता उपलब्ध असुन त्या बाबत नेवासा न्यायालयामध्ये रे.मु.नं. ९६८/२०२३ मध्ये रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता कायम केलेला आहे. सदर विश्लेषणावरुन या रेस्पॉडंट यांना पर्यायी रस्ता वाहतुकीसाठी असल्याचे दिसते. तहसिलदार नेवासा यांनी केलेला स्थळनिरिक्षण पंचनाम्यात सध्याचे रेस्पॉडंट यांचे पर्यायी रस्त्या बाबत स्पष्ट नमुद केलेले नाही. तहसिलदार नेवासा यांनी नव्याने रसता मंजुर करण्यापुर्वी मुळ अर्जदार सध्याचे रेस्पॉडंट नं. १ व २ हे कोणते रस्त्याने वहिवाट करीत होते या बाबत स्थळनिरिक्षण पंचनाम्यात स्पष्ट उल्लेख नाही. जर मुळ अर्जदार सध्याचे रेस्पॉडंट नं. १ व २ यांना पर्यायी रस्ता होता तर त्यांना त्यांचे शेतजमिनीत जाणेसाठी नविन रस्त्याची काय आवश्यकता या बाबतही तहसिलदार यांनी स्पष्ट खुलासा केलेला नाही. अशा परिस्थितीत

तहसिलदार नेवासा यांनी प्रस्तुत प्रकरणी फेरचौकशी करुन स्थळनिरिक्षण च्या वेळेस पर्यायी रस्त्या बाबत सविस्तर चौकशी करून वस्तुस्थितीनुरूप नव्याने आदेश पारीत करणे क्रमप्राप्त असलेने मुद्दा क्र. १ बाबतचे निष्कर्ष अंशतः होकारार्थी आहे.

वरील मुद्याचा विचार करता तहसिलदार नेवासा यांनी प्रस्तुत प्रकरणी केलेले स्थळनिरिक्षण पंचनामा हा त्रोटक स्वरुपाचा असुन सुस्पष्ट नसलेने सदर स्थळनिरिक्षण पंचनाम्याचे आधारे तहसिलदार यांनी रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये पारीत केलेले आदेश रद्द करून प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चौकशी करून फेरआदेश पारीत करणे कामी प्रकरण तहसिलदार नेवासा यांचेकडे परत पाठविणे उचित होणार असलेने मी उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर भाग अहिल्यानगर मला महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अपेलंट यांचे अपील अशंतः मंजुर करण्यात येत आहे.
२. मौजे देडगाव, ता.नेवासा येथील रस्ता केस नं. ३६/२०२३ मध्ये तहसिलदार नेवासा यांनी दिनांक १६/०२/२०२४ रोजी दिलेले आदेश रद्द करुन निकालपत्रात नमुद कारणास्तव प्रकरण फेरचौकशी करून आदेश पारीत करणेकामी तहसिलदार नेवासा यांचेकडे परत पाठविण्यात येत आहे.
३. खर्चा बाबत आदेश नाहीत.
४. निकालाची समज उभय पक्षकारांना देण्यात यावी.
५. सदरचा निकाल **www.eQjcourt.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
६. सदरचा आदेश मान्य नसल्यास संबंधित पक्षकार ६० दिवसांच्या मुदतीत मा.अपर जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडेस अपील दाखल करु शकतील.

**ठिकाण : अहिल्यानगर**
**दिनाक : ०३/०२/२०२५**

Sudhir Martand Patil
Digitally signed by Sudhir Martand Patil
Date: 2025.02.03

**(सुधीर पाटील)**
**उपविभागीय अधिकारी,**
**अहिल्यानगर भाग अहिल्यानगर**

प्रत : तहसिलदार नेवासा यांचेकडेस माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी.